**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,**
३०२,वेक फिल्ड हाऊस,३ रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई४०० ००१.
दूरध्वनी क्र.२२६९४९८४/८५,Email:ccfmmumbai@gmail.com/dcfmangrovecell@gmail.com/konkanmangroves@gmail.com

**विषय**:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या
बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-१/ल.ले/ २८ /सन २०१९-२०
फोर्ट, मुंबई ४०० ००१ दिनांक: २१/०६/२०१९

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी.
संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
५. संचालक, पर्यावरण विभाग.
६. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
७. महानगर पालिका आयुक्त / सह आयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
८. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
१०. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
११. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

उपरोक्त विषयान्वये कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची **२३** वी बैठक दिनांक **१६/०५/२०१९** रोजी मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे घेण्यात आली सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येत आहे.

सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

## कोकण विभागातील वेटलँन्ड संदर्भात पाणथळ तक्रार समितीची २३ वी मासिक बैठक दि.१६/०५/२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

| अ. क्र | मुद्दा | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | श्री. नंदकुमार पवार<br>1) Dastan phata jasai, where almost 100 acres of wetland is reclaimed, Reclamation still continue. | • या तक्रारी संदर्भात उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई तथा समितीचे सदस्य सचिव यांनी सदर ठिकाणी दि.३०.०४.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असे सांगितले.<br>• तसेच दस्तान फाटा या जागेचे जी.पी.एस रिडींगनुसार MRSAC वेबसाईद्वारा तपासणी केली असता सदर क्षेत्र हे वेटलॅन्ड क्षेत्र नसल्याचे दिसते असे बैठकीत प्रत्यक्ष नकाशे दाखवीले.<br>• सदर ठिकाणी वॉटर बॉडी असल्याचे दिसते.<br>• जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींनी सदर ठिकाणी भात शेती असल्याचे सांगितले.<br>• तसेच या संदर्भात तहसिलदार उरण यांनी उरण तालुक्यातील १३१ जागा पाणथळ घोषित करण्याकरिता पर्यावरण विभागामार्फत प्रक्रीया सुरु असल्याचे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने उरण येथील पाणथळाचे संरक्षण करण्यासाठी १३१ जागेची माहिती समितीस देण्यास सांगितले व सदर जागेवर होणारे Reclamation तात्काळ थांबविण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी रायगड व तहसिलदार उरण |
| २ | Complaint No: KW7<br>Wetland destruction<br>अज्ञात व्यक्ती गायमुख रेतीबंदर गांधी प्लॉट येथे भरणी | • सदर ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास झाला नसुन बफर झोनमध्ये डेब्रिज टाकल्यामुळे या जागेवरील डेब्रिज काढण्याच्या सूचना समितीने तहसिलदार ठाणे यांना दिल्या होत्या तसेच भराव काढण्यासाठी ठाणे महानगरपालिकेला कळविण्यात आले आहे.<br>• तहसिलदार ठाणे यांच्या दि.२६.११.२०१९ रोजीच्या अहवालानुसार या ठिकाणी कांदळवनाच्या झाडांचा ऱ्हास झाल्याचे निदर्शनास आल्याने प्रदुषण नियंत्रण अधिकारी ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी गायमुख भागातील खाडी किनाऱ्यावरील गांधी प्लॉट येथे अज्ञातांद्वारे मातीचा भराव झाल्याचे निदर्शनास आलेबाबत दि. ३०.०७.२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले असल्याने मंडळ अधिकारी बाळकुम यांनी कासारवडवली पोलीस स्टेशन येथे मे.जे.व्ही.पी. इन्फ्राप्रोजेक्ट कंपनीचे संचालक शामकांत बोरसे व इतर यांचे विरुध्द गुन्हा दि. १४.०९.२०१८ रोजी दाखल करण्यात आला आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने ही तक्रार बंद करण्याच निर्देश दिले. | ठाणे महानगरपालिका आणि तहसीलदार, ठाणे (जिल्हाधिकारी ठाणे) |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्री. धिरज परब - भाईंदर पश्चिम, येथे मुर्धा रेव आगार भागात सरकारी जागेत नैसर्गिक पाळथळाचा ऱ्हास. स्थळ :- भाईंदर प, जि.ठाणे. | • या तक्रारी संदर्भात उप आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या दि. १९.०६.२०१८ रोजीच्या अहवालानुसार पत्राशेड असलेले ३६ कच्चे बांधकामे व प्लास्टीक कपडयाच्या सहाय्याने ८ कच्ची बांधकामे हटविण्यात आली आहेत.<br>• त्या अनुषंगाने समितीने ही तक्रार बंद करण्याच निर्देश दिले. | तहसिलदार ठाणे आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| ४ | श्री. धिरज परब :- भाईंदर पश्चिम राधा स्वामी सत्संग व परिसरात पाणथळ, कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत. | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार ठाणे यांच्या अहवालानुसार सदर ठिकाणी आज रोजी कांदळवनाचे नुकसान अथवा कत्तल झाल्याचे दिसून येत नाही.<br>• तहसिलदार ठाणे यांनी राधा स्वामी सत्संग या परिसराच्या Geo-Coordinates ची MRSAC वेबसाईद्वारा तपासणी केली असता सदर क्षेत्रामध्ये वेटलॅन्ड नसल्याचे दिसते.<br>• परंतु सदर ठिकाणी कांदळवन असल्यामळे सदरची तक्रार ही पाणथळ तक्रार निवारण समितीमधून बंद करुन कांदळवन समितीकडे वर्ग करण्याचे निर्देश समितीने दिले. | तहसिलदार ठाणे |
| ५ | श्री. धिरज परब:- मीरा भाईंदर महापालिका हद्दीतील मीरारोड पश्चिम येथे नाझरेथ आगर परिसरात सरकारी व खाजगी जागेत कांदळवन पाणथळ चा ऱ्हास करून CRZचे उल्लंघन. | • तहसिलदार ठाणे यांच्या दि.२६.११.२०१९ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार सदर ठिकाणी आज रोजी दिलेल्या नाझरेथ आगार या परिसराच्या Geo-Coordinates ची MRSAC वेबसाईद्वारा तपासणी केली असता सदर क्षेत्र हे वेटलॅन्ड यादीतील क्षेत्र नसल्याचे दिसते.<br>• परंतु सदर ठिकाणी कांदळवन असल्यामळे सदरची तक्रार ही पाणथळ तक्रार निवारण समितीमधून बंद करुन कांदळवन समितीकडे वर्ग करण्याचे निर्देश समितीने दिले. | तहसिलदार ठाणे |
| ६ | श्री. धिरज परब:- पालघर जिल्हयातील वसई तालुक्यात वरसावे पूल महामार्गापासून लोढा जैन मंदिर पर्यंतच्या परिसरात कांदळवन, पाणथळचा नाश करुन,सीआरझेड,इकोसेन्सेटिव्ह झोनमध्ये चाललेल्या प्रचंड भराव- बांधकामा प्रकरणी. | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार वसई यांनी सदर ठिकाणी महामार्गाजवळ कांदळवनात भराव झाल्यामुळे ५ गावांची माहिती महापालिकेकडून प्राप्त झाली असून वेटलॅन्ड चे सर्वे चालू आहे.<br>• तसेच या जागेवर डेब्रिज भराव करण्याऱ्या ४६ वाहने जप्त करण्यात आलेली आहेत. त्या अनुषंगाने समितीने तहसिलदार वसई यांना या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | तहसिलदार वसई (जिल्हाधिकारी पालघर) |
| ७ | श्री. धिरज परब :- आमदार नरेंद्र मेहता यांनी सत्ता व पदाचा दुरुपयोग करून महापालिका आदींच्या संगनमताने पर्यावरणाचा केलेला ऱ्हास ७११ क्लब | • तसेच या ठिकाणी कांदवनाची तोड झाल्यामुळे उपविभागीय अधिकारी ठाणे यांच्या मार्फत संबंधीतांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच उपसमितीमार्फत देखील या स्थळ पाहणी झालेली आहे.<br>• तहसिलदार ठाणे यांनी दिलेल्या Geo-Coordinates ची MRSAC वेबसाईद्वारा तपासणी केली असता सदर क्षेत्र हे वेटलॅन्ड यादीतील क्षेत्र नसल्याचे दिसते परंतु काही प्रमाणात | तहसिलदार, ठाणे (जिल्हाधिकारी ठाणे) मिरा-भाईंदर महानगरपालिका - अहवाल प्राप्त |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कांदळवन (Sparse) असल्याचे MRSAC २००५ च्या नकाशानुसार दिसून येते.<br>• त्या अनुषंगाने ही तक्रार बंद करण्याबाबतचे निर्देश समितीने दिले आहे. | |
| ८ | श्री. धिरज परब<br>मीरारोडच्या कनकिया भागात सर्वे क्र. ३८ मध्ये पाणथळ, कांदळवन, सीआरझेड मध्ये पर्यावरणाचा ऱ्हास केले बाबत. | • तहसिदलार ठाणे यांच्या दि.२६.११.२०१८ रोजीच्या अहवालानुसार मौजे नवघर येथील सर्वे क्र. ३८ कब्जेदार सदरी सॉल्ट डिपार्टमेंट इ.गर्व्हमेंट यांचे नावे दाखल असून खाडी लागुन आहे.<br>• सदर क्षेत्र हे अधिसुचित पाणथळ क्षेत्र नसून सदर ठिकाणी विरल प्रमाणात कांदळवन आहे. सदर जागेवरील पाण्याचे मार्ग हे काही ठिकाणी बंद झाल्यामुळे कांदळवनाची झाडे सुकलेली दिसून येतात. परंतु या ठिकाणी MRSAC वेबसाईद्वारा तपासणी केली असता सदर क्षेत्र कांदळवन क्षेत्र नाही.<br>• त्या अनुषंगाने सदची तक्रार पाणथळाची नसून कांदळवनाची असल्यामुळे ही तक्रार कांदळवन समितीकडे वर्ग करण्यात यावी. | तहसिलदार, ठाणे (जिल्हाधिकारी ठाणे) मिरा-भाईंदर महानगरपालिका - अहवाल प्राप्त |
| ९ | श्री. अजिंक्य पाघधरे<br>पालघर जिल्ह्यातील मौजे धाकटी डहाणू येथे महसूल गावं बाडापोखरण येथिल सर्व्हे नं.३७१ अ १/१/१/१ मधिल कांदळवन पाणथळचा नाश करून बांधलेल्या बेकायदा बांधकामबबाबत. | • तहसिलदार वसई यांच्या कडून या तक्रारीबाबत अद्याप अहवाल व G.P.S. Reading प्राप्त झालेले नाही.<br>• या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी पालघर यांना पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना समितीने दिल्या आहेत.<br>• या तक्रारी संदर्भात SDO पालघर यांनी ३७१ सर्वे नं.हा शासकीय असून कांदळवन ८०० ते ९०० मीटर अंतराव आहे. सदर ठिकाणी कांदळवन आहे किंवा कसे याबाबत उपवनसंरक्षक, डहाणू यांना पत्र देण्यात आले आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने SDO पालघर यांना केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | तहसिलदार डहाणू (जिल्हाधिकारी पालघर) |
| १० | श्री. धिरज परब:- भाईंदर पूर्व, जेसलपार्क येथे वसई खाडी किनारी कांदळवन, पाणथळ, सीआरझेड १ मध्ये मेरीटाईम बोर्ड ने जेट्टी, रॅम्प व पालिकेने रस्ता बांधकामे केले बाबत. | • या तक्रारीबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या दि.५.११.२०१८ रोजीच्या अहवालानुसार भाईंदर पुर्व भगातून जेसल पार्क रेल्वे समांतर नाला असून सदर नाला हा पुर्वीपासून अस्तीत्वात आहे सदर ठिकाणी नाल्यावर असलेले अडथळे काढून टाकण्यात आले आहेत तसेच नाले पक्या स्वरुपात बांधण्यात आलेले आहे.<br>• तसेच या तक्रारी संदर्भात ५ गुन्हे देखील दाखल केलेले आहेत.<br>• मेरीटाईम बोर्ड ने जेट्टी बांधकाम सर्व परवानग्या घेऊन करण्यात आले आहे असे उप आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी सांगितले.<br>• तसेच तहलिसदार ठाणे यांनी दिलेल्या Geo-Coordinates | तहसिलदार ठाणे (जिल्हाधिकारी ठाणे) |
| ११ | श्री. धिरज परब: - जेसलपार्क खाडी पात्रात व किनारी कांदळवन, पाणथळ मध्ये महापालिके कडून बेकायदा नाले बांधून सांडपाणी सोडणे तसेच कचरा, निर्माल्य प्लॅस्टिक व | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | अन्य साहित्य टाकून पर्यावरणाचा ऱ्हास | ची MRSAC वेबसाईद्वारा तपासणी केली असता सदर क्षेत्र हे वेटलॅन्ड यादीतील क्षेत्र नसल्याचे दिसते.<br>• तसेच श्री. धिरज परब यांच्या तक्रारींबाबत उप समितीच्या स्थळ पाहणीचा Part 2 अहवाल अद्याप प्रलंबित असल्याने तहसिलदार ठाणे यांनी पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करु असे सांगितले. | |
| १२ | श्री. धिरज परब: - मीरा भाईंदर महापालिका हद्दीतील नवघर गाव मागील सरकारी खाजण सर्वे क्र. १५ मध्ये मनपाने पाणथळ, कांदळवन व सीआरझेड १ मध्ये बेकायदा टाकलेला कचरा, भराव काढून कांदळवनाची लागवड | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार ठाणे यांच्या अहवालानुसार सदर ठिकाणी मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे मार्फत तोडण्यात आलेल्या झाडांच्या फांद्या व इतर कचरा जाळले असल्याचे दिसून येते.<br>• तसेच तहसिलदार ठाणे यांनी दिलेल्या दिलेल्या Geo-Coordinates ची MRSAC वेबसाईद्वारा तपासणी केली असता सदर क्षेत्र हे वेटलॅन्ड यादीतील क्षेत्र नसल्याचे दिसते.<br>• त्या अनुषंगाने सदची तक्रार पाणथळाची नसून कांदळवनाची असल्यामुळे ही तक्रार कांदळवन समितीकडे वर्ग करण्यात यावी. | तहसिलदार ठाणे (जिल्हाधिकारी ठाणे) |
| १३ | श्री. बद्री चॅटर्जी<br>Wetland reclamation at, opposite of Cielo, LODHA spendora, Bhayander pada, Ghodbandar road, Thane. | • तहसिलदार ठाणे यांच्या अहवालानुसार सदर ठिकाणी २२१७३ ब्रास भराव हा डेब्रीजचा दिसत असून काही ठिकाणी माती असून स्थानिक पंचांच्या अंदाजनुमते ८७ टक्के डेब्रिज असून १५ टक्के माती जमीन समतल करण्यासाठी वापरलेली असल्याचे दिसून येते.<br>• सदर संपूर्ण भराव हा कांदळवन क्षेत्रापासून ५० मीटरच्या आत झालेला दिसून येत आहे.<br>• सदरचे क्षेत्र हे पाणथळ नसल्याचे समजते.<br>• त्या अनुषंगाने सदरची तक्रार कांदळवन समितीकडे वर्ग करण्यात येत आहे. | जिल्हाधिकारी ठाणे |
| १४ | श्री. सुनिल अगरवाल<br>Destruction of Uran wetlands & Mangroves - Dastaan Node. | (इतिवृत्तातील मुद्दा क्र.१ नुसार कार्यवाही करण्याच्या सूचना समितीने दिल्या.) | सिडको आणि जिल्हाधिकारी रायगड |
| १५ | श्री. नरेशचंद्र सिंग<br>Please Help Us Save Kharghar Sector 35 Pond - TOI report. | • या तक्रारी संदर्भात सिडको यांच्या प्रतिनिधींनी या जागेवर पाणथळ नसल्याचे सांगितले व तेथील भराव काढण्यात आलेला आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदर जागेवर कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या.<br>• सदर क्षेत्राचे GPS Location उपलब्ध नसल्यामुळे सदरचे क्षेत्र पाणथळ आहे किंवा कसे हे सिध्द होत नाही.<br>• त्या अनुषंगाने समितीने ही तक्रार बंद करण्याच निर्देश दिले. | सिडको |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | श्री. नरेशचंद्र सिंग (अभिव्यक्ती गृप) Immediately Stop Dumping of Debris and Reclamation work in Sector 17 Kharghar Coastal Wetland (CRZ notified zone) | • या तक्रारी संदर्भात सिडको यांच्या प्रतिनिधींनी तक्रारदार यांना स्थळ पाहणीसाठी संपर्क केले असता त्यांनी काही प्रतिसादर दिला नाही असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारी संदर्भात योग्य जागेची माहिती जी.पी.एस. Location नसल्यामुळे ही तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले. | सिडको |
| १७ | श्री. स्टॅलीन डी – दि.३१.०१.२०१९ Please act to stop illegal destruction of wetlands In Wadala /nearby areas | • या तक्रारी संदर्भात समितीने जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्या दि.२५.०४.२०१९ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार सदर जागा वडाला रोडच्या कडेला तसेच भक्ती पार्क मोनोरेल स्टेशन खालून जाणाऱ्या रोडच्या दोन्ही बाजूस ठिक ठिकाणी दगड, माती, रॅबीटचे ढिग आढळून आले. सदर ढिग रस्त्याच्या कडेला असून त्याला लागून कांदळवन आहे. प्रत्यक्ष कांदळवनाचा ऱ्हास झालेला दिसून येत नाही.<br>• तसेच सदर जागा सॉल्ट विभागाच्या नावे दि. ०१.०८.१९९७ रोजी हस्तांतरीत झालेली असल्याचे नोंदीवरुन दिसून येते. त्यापैकी संरक्षीत कांदळवनासाठी (Reserve Forest area ८.३१०० ha.) देण्यात आलेले असल्याचे मिळकत पत्रिकेमधील रकाना क्र. १० वरुन दिसून येते.<br>• समितीने सदर जागेवरील डेब्रिज काढण्यासाठी मुंबई महानरगपालिका BMC यांच्या संबंधीत अधिकाऱ्यांनी श्री. स्टॅलीन डी यांच्या सोबत स्थळ पाहणीकरुन सदर जागेवरील डेब्रिज हटविण्याची कार्यवाही करण्यास सांगितले. | जिल्हाधिकारी मुंबई शहर |
| १८ | Well Wisher and Environment activist दि.२५.०३.२०१९ Dumping of C & D Waste, Cutting of Mangroves and Destruction of the Wetland in Village Kasheli Tal. Bhiwandi Dis. Thane. | • या तक्रारी संदर्भात सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष यांनी सदरचे क्षेत्रामध्ये पाणथळ नसून कांदळवन क्षेत्र असून तेथे अनधिकृतपणे भराव चालू आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने जिल्हाधिकारी ठाणे यांच्या प्रतिनिधींना या तक्रारीबाबत तात्काळ कार्यवाही करुन या बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी देण्यास सांगितले. | जिल्हाधिकारी ठाणे |
| १९ | श्री. स्टॅलिन डी दि. १८.०३.२०१९ Continous reclamation and construction on Wetlands at Bhayanderpada Ghodbunder road by squarefeet Group. | • या तक्रारी संदर्भात सदस्य सचिवांना मिळालेल्या Geo-Coordinates द्वारा सदरचे क्षेत्र पाणथळ आहे किंवा कसे हे तपासले जाईल व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल असे समितीमध्ये सांगितले. | जिल्हाधिकारी ठाणे |
| २० | श्री. सुनिल अगरवाल दि. २३.०३.२०१९ Save Karal Wetland – | • या तक्रारी संदर्भात् जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींनी या तक्रारीबाबत अद्याप स्थळ पाहणी झालेली नाही असे सांगितले. | जिल्हाधिकारी रायगड |

| | | | |
|---|---|---|---|
| | Birds Favourite Place.<br>GPS Location उपलब्ध नसल्यामुळे सदरचे क्षेत्र पाणथळ आहे किंवा कसे याचा बोध होत नाही. | • त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत तात्काळ स्थळ पाहणी करुन या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूनचा दिल्या. | |
| २१ | श्री. सुनिल अगरवाल व श्री. स्टॅलिन डी. २४.०३.२०१९<br>Drying up of Panje Wetland in Uran & debris dumping in Bhenkhal<br>Wetland atlas नुसार पाणजे वेटलॅन्उ हे वेटलॅन्ड क्षेत्र नाही. | • या तक्रारी संदर्भात सदस्य सचिवांनी MRSAC नकाशाच्या पाहणी नुसार बेनखल येथे पाणथळ असल्याचे सांगितले.<br>• सदर ठिकाणी मोठया प्रमाणात डेब्रिज भराव होत असल्यामुळे समितीने जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींना तेथील भराव थांबविण्याच्या हटविण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी रायगड व सिडको |
| २२ | श्री. विनोद पुन्शी –<br>दि ०९.०५.२०१९<br>Wetland being filled up overnight<br>Near Indian Institute of Geo magnetism campus. | • या तक्रारी संदर्भात सदस्य सचिवांनी Wetland atlas नुसार सदरचे क्षेत्र हे वेटलॅन्ड क्षेत्र नाही असे सांगितले.<br>• समितीने या तक्रारी बाबत नवी मुंबई महानगरपालिका यांना सदर जागेची स्थळ पाहणी करुन अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | सिडको आणि आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका |
| * | सर्व सदस्यांसाठी समितीचे आदेश | • वरील सर्व तक्रारीं संदर्भात चर्चा झाल्यावर समितीने सर्व सदस्यांना या समितीच्या बैठका मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार घेतल्या जात असल्याने समितीच्या सर्व सदस्यांनी त्या त्या जिल्हयांतील तक्रारींबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी प्राधान्याने सादर करण्याचे आदेश दिले. | सर्व सदस्य |

सदर सभेत उपस्थित असलेल्या सभासदांचे आभार मानून बैठक संपल्याचे सचिवांकडून जाहिर करण्यात आले.

सदस्य सचिव
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.